**ठळक बातम्या**

- आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ

- भारताच्या प्रोजेक्ट चित्तासाठी बोत्सवानाकडून ८ चित्त्यांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत प्रतिकात्मक हस्तांतरण

- खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी देशव्यापी अभियानात आतापर्यंत ३ लाखांहून अधिक ठिकाणी छापेमारी

- दिल्ली स्फोटातल्या हल्लेखोराची ओळख पटली

**आणि**

- राजकोट इथं सुरु असलेल्या एक दिवसीय क्रिकेट सामन्यात दक्षिण अफ्रिका अ- संघाचं भारत अ- संघापुढं विजयासाठी २८६ धावांचं आव्हान

**<><><><><>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात सुमारे २५ हजार कोटी रुपये खर्च करून करण्यात येणारी पायाभूत सुविधांची कामं पुढची २५ वर्षं टिकतील अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. नाशिकमध्ये पुढच्या वर्षीपासून सुरू होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा प्रारंभ आज मुख्यमंत्री फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज झाला. त्यावेळी ते बोलत होते. कुंभमेळ्याच्या सिंहस्थ पर्वाविषयी मुख्यमंत्री म्हणाले...

**होल्ड... बाईट - मुख्यमंत्री (१४ सेकंद)**

येत्या काळात कुंभमेळ्याच्या कामांमधून नाशिक आधुनिक होणार आहे तसेच तीर्थक्षेत्र आणि पर्यटन क्षेत्र म्हणून या शहराचा विकास करण्यात येणार असल्याचं

मुख्यमंत्री म्हणाले. नाशिकचा कुंभमेळा स्वच्छ सुंदर आणि सुरक्षित व्हावा यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न सुरू आहेत, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. कुंभमेळ्यासाठी लागणाऱ्या साधुग्रामच्या जागेचं कायमस्वरूपी भूसंपादन करायला प्राधान्य देण्यात येणार असल्याचंही शिंदे आपल्या भाषणात म्हणाले. या कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे तसंच अन्य मान्यवरही उपस्थित होते. या कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी रामकुंड परिसरात सुरू असलेल्या कामांची पाहणी केली तसंच राम काल पथ या प्रकल्पाचं भूमिपूजन केलं. यानंतर नाशिक जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

**<><><><>**

भारताच्या प्रोजेक्ट चित्ताला बोत्सवानाने ८ चित्त्यांची देणगी दिली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत आज गॅबोरोन संरक्षित अरण्यात या प्रतिकात्मक हस्तांतरणाचा सोहळा झाला. बोत्सवानाचे अध्यक्ष ड्यूमा बोको देखील यावेळी उपस्थित होते. बोत्सवानातल्या घांझी जंगलातून आणलेले हे चित्ते भारतात पोहोचल्यावर त्यांना सुरुवातीला काही काळ विलगीकरणात ठेवलं जाईल. यापूर्वी नामिबियामधून ८ तर दक्षिण आफ्रिकेतून १२ चित्ते आणले आहेत. त्यातले बहुतेक सगळे इथल्या वातावरणाला सरावले आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज बोत्सवानामधल्या भारतीय समुदायाशी संवाद साधला. कार्यक्रमात सुरुवातीला दिल्ली स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांना एक मिनिटभर मौन पाळून आदरांजली वाहिली. बोत्सवाना आणि भारतादरम्यान स्नेहाचा सेतू बांधण्याचं आवाहन मुर्मू यांनी केलं. २०४७ पर्यंत विकसित भारत निर्माणाच्या यात्रेत तिथले भारतीयही सोबतीला आहेत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी शेती आणि शेतकरी कल्याण विभागानं देशभरात चालवलेल्या अभियानात आतापर्यंत ३ लाखांहून अधिक ठिकाणी छापेमारी केली असून सुमारे साडेतीन हजारांहून जास्त दुकानांचे परवाने रद्द केले आहेत. या कारवाईत ४१८ जणांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. तसंच राज्यातल्या सुमारे एक हजार दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले.

रब्बीच्या हंगामात शेतकऱ्यांना योग्यवेळी खतं उपलब्ध व्हावीत तसंच खतांची साठेबाजी रोखण्यासाठी हे अभियान सुरु करण्यात आलं आहे. महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार, हरियाणा, पंजाब, ओदिशा या राज्यात छापेमारी करण्यात आली. या कारवाईमुळे खतांचा कृत्रिम तुटवडा आणि किमतीत केलेले फेरफार रोखता येतील.

**<><><><><>**

पुणे भूखंड घोटाळा प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पार्थ पवार यांना वाचवलं जात असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. राज्यात गैरव्यवहार उघडकीस येतात मात्र, भारतीय जनता पक्षाकडून त्यांना वाचवलं जातं, असं ते म्हणाले. छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्याकडून शहरातल्या मतदार यादीत घोटाळा करण्यात आला असून, हे काम अधिकाऱ्यांनी राजकीय दबावाखाली केलं असेल, असा आरोपही दानवे यांनी केला.

**<><><><><>**

माजी मुख्यमंत्री आणि सहकार महर्षी वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधान भवन परिसरातल्या वसंतदादा यांच्या पुतळयाला अभिवादन केलं. विधानमंडळ सचिवालयातले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही वसंतदादा

पाटील यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. सांगलीतल्या वसंतदादा यांच्या समाधीस्थळी तसंच वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना, जिल्हा काँग्रेस कमिटी इथंही सहकार महर्षींना अभिवादन करण्यात आलं.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज यांना आग्रा इथं नजरकैदेत ठेवण्यात आलं होतं, ती वास्तू अधिग्रहित करून तिथे स्मारक उभारलं जाणार आहे. यासाठी आग्रा इथल्या या जागेचं अधिग्रहण आणि संबंधित प्रक्रिया राबवण्याकरता उत्तर प्रदेश शासनाशी समन्वय साधण्यासाठी 'समन्वयक' म्हणून पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><><>**

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ स्फोट घडवणारी व्यक्ती डॉक्टर उमर उन नबी असल्याचं डीएनए चाचणीतून स्पष्ट झालं आहे. स्फोटानंतर त्याचा पाय स्टीअरिंग व्हील आणि ॲक्सिलरेटरमध्ये अडकला होता. त्याचा डीएनए नमुना त्याच्या आईशी जुळला असल्याची माहिती, दिल्ली पोलिसांनी दिली.

दरम्यान, दिल्ली मेट्रोचं लाल किल्ला स्थानक सुरक्षेच्या कारणास्तव पुढची सूचना मिळेपर्यंत बंद राहील असं मेट्रो रेल कॉर्पोरेशनने कळवलं आहे. या तपासादरम्यान, अलफलाह विद्यापीठाच्या आवारातून आज आणखी एक कार पोलिसांनी ताब्यात घेतली. हे वाहन, संशयित शाहीन शाहीदच्या नावावर असल्याचं समजतं. काल दिल्लीत सर्व पोलीस ठाणी, तपासणी नाके तसंच हरयाणा, उत्तर प्रदेश पोलिसांसाठी दक्षतेचा इशारा जारी केला आहे. जम्मू काश्मीरमधे जैश ए मुहम्मद या प्रतिबंधित संघटनेशी संबंधित १३ ठिकाणांवर आज छापे टाकण्यात आले.

**<><><><><>**

राजकोट इथं सुरु असलेल्या पहिल्या अनौपचारिक एक दिवसीय सामन्यात दक्षिण अफ्रिका अ-संघानं भारत अ- संघापुढं विजयासाठी २८६ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दक्षिण अफ्रिका अ-संघानं ९ गडी गमावून २८५ धावा केल्या. डेलानो पोजितरनं सर्वाधिक ९० धावा केल्या. डियान फॉरेस्टरनं ७७, तर बिजॉर्न पोर्टइननं ५९ धावांचं योगदान दिलं.

<><><><><>

एमसीए अर्थात मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत अजिंक्य नाईक यांच्या पॅनलचा विजय झाला आहे. एमसीएच्या एकूण १६ पदांपैकी १२ पदांवर नाईक यांच्या पॅनेलचे उमेदवार निवडून आले आहेत. जितेंद्र आव्हाड हे उपाध्यक्ष पदावर निवडून आले आहेत. उन्मेष खानविलकर हे सचिव पदावर, निलेश भोसले संयुक्त सचिव पदावर तर अरमान मलिक खजिनदार पदावर निवडून आले आहेत. याशिवाय संदीप विचारे, सूरज सामंत, मिलिंद नार्वेकर हे देखील कार्यकारी समितीच्या सदस्य पदांवर निवडून आले आहेत.

<><><><><>

शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचं बियाणं परवडणाऱ्या दरात मिळावं तसंच बोगस बियाण्याला प्रतिबंध व्हावा याकरता केंद्रसरकारने बियाणे विधेयक २०२५चा मसुदा तयार केला आहे. हे विधेयक १९६६ सालच्या बियाणे कायदा आणि १९८३चा बियाणे नियंत्रणआदेश यांची जागा घेईल. बियाणे पुरवठा साखळीत पारदर्शकता, आणि जबाबदारी निश्चित करुन शेतकऱ्यांचं हितरक्षण हे या कायद्याचं उद्दिष्ट आहे. विधेयकाचा मसुदा शेती आणि शेतकरी कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाला असून येत्या ११ डिसेंबर पर्यंत त्यावर सूचना आणि हरकती नोंदवता येतील.

<><><><><>

नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी संकेतस्थळावर उमेदवारी अर्ज आणि शपथत्रातली माहिती भरणं आवश्यक असून त्यासोबत कोणतंही कागदपत्र अपलोड करायची गरज नाही, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. उमेदवारी अर्ज आणि शपथपत्र यांच्या छापील प्रतीवर सही करून आवश्यक कागदपत्रांसह ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करावं असं निवडणूक आयोगानं सांगितलं. राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात झालीआहे. हे अर्ज maha s e c e l e c.in या संकेतस्थळावर भरायचं आहे.

<><><><><>

भारतीय लष्करी सेवेत असलेले लान्स नायक अविनाश आदिनाथ वायभसे यांचं पुणे इथल्या कमांड रुग्णालयात काल अल्पशा आजारानं निधन झालं. आज सकाळी शासकीय इतमामात त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस खात्याने गार्ड ऑफ ऑनर तसंच प्रशासनाने मानवंदना दिली.

<><><><><>

गेल्या २४ विदर्भात बऱ्याच ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली. मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात संपूर्ण महाराष्ट्रात हवामान कोरडं राहील, असा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

//<><><><><>//